भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# ऐच्छिक ठेवी (उन्मुक्ती आणि सूट) अधिनियम, १९९१

**(१९९१ चा अधिनियम क्रमांक ४७)**

[२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान]

# The Voluntary Deposits (Immunities and Exemptions) Act, 1991

**(Act No. 47 of 1991)**

[*As in force on the 2nd May 1997*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९९९)

[**किंमत : रु. ३-००**]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ मे १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि व्हॉलेन्टरी डिपॉझिट्स (इम्युनिटिश अँण्ड एक्झम्पशन्स) अॅक्ट, १९९१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक १, दिनांक २२ ऑक्टोबर १९९७ यात पृष्ठ ५४ ते ५५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २२ ऑक्टोबर १९९७.

डॉ. रघबीर सिंग,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Voluntary Deposits (Immunities and Exemptions) Act, 1991, as on the 2nd May 1997, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in Gazette of India, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 8, dated 22nd October 1997, on pages 54 to 55.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it become the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 22nd October 1997.

DR. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India

# ऐच्छिक ठेवी (उन्मुक्ती आणि सूट) अधिनियम, १९९१

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. उन्मुक्ती.

४. विशिष्ट प्रकरणांमध्ये विचारात न घेतली जाणारी ठेव.

५. १९८७ चा अधिनियम क्रमांक ५३ चे विशोधन.

# ऐच्छिक ठेवी (उन्मुक्ती आणि सूट) अधिनियम, १९९१

(१९९१ चा अधिनियम क्र. ४७)

(२ मे, १९९७ रोजी यथाविद्यमान)

[२० सप्टेंबर १९९८]

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेत ऐच्छिक ठेवी ठेवणाऱ्या व्यक्तींना विवक्षित उन्मुक्ती देण्यासाठी आणि अशा ठेवींच्या संबंधात प्रत्यक्ष करात विवक्षित सूट देण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित वा आनुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, परिणामकारक आर्थिक व सामाजिक नियोजनासाठी, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला ज्यामुळे गंभीर धोका निर्माण झाला आहे, असा काळा पैसा, विवक्षित सामाजिक उद्दिष्टे पार पाडण्याच्या कामी लावणे आवश्यक आहे, आणि ज्याअर्थी असा पैसा सामाजिक उद्दिष्टांच्या कामी लावण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने तयार करावयाच्या योजनेस अनुसरून त्या बँकेत ठेवल्या जाणाऱ्या ऐच्छिक ठेवींना अनुमती देण्याचे ठरविले आहे; ज्या अन्वये, या ठेवींच्या चाळीस टक्के रक्कम गलिच्छ वस्ती निर्मूलनासाठी व गरिबांसाठी अल्प किमतीत गृह निर्माण करण्यासाठी वित्तपुरवठा करण्याकरिता उभारावयाच्या विशेष निधीत जमा करण्यात येईल, आणि या ठेवींच्या साठ टक्के रकमेचा विनियोग ठेवीदार त्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांकरिता करू शकतील;

आणि ज्याअर्थी काळा पैसा ताब्यात असलेल्या व्यक्तींना अशा ठेवी ठेवणे शक्य व्हावे यासाठी विवक्षित उन्मुक्ती व सूट देण्यासाठी उपबंध करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बेचाळिसाव्या वर्षी तो संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

१. (१) या अधिनियमास ऐच्छिक ठेवी (उन्मुक्ती व सूट) अधिनियम, १९९१ असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव व विस्तार.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यकतेनुसार नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "ठेव" याचा अर्थ, कोणत्याही व्यक्तीने राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेत या योजनेनुसार या अधिनियमांच्या प्रारंभी वा नंतर परंतु, विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी ठेवलेली ऐच्छिक ठेव, असा आहे;

**स्पष्टीकरण** :—या खंडाच्या प्रयोजनार्थ "विनिर्दिष्ट दिनांक" याचा अर्थ, १ डिसेंबर, १९९१ किंवा केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील असा अन्य नंतरचा दिनांक, असा आहे;

(ख) "राष्ट्रीय गृहनिर्माण बँक" याचा अर्थ, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ (१९८७ चा ५३) यांच्या खंड ३ अन्वये प्रस्थापित केलेली राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, असा आहे;

(ग) "निव्वळ ठेव" याचा अर्थ, या योजनेनुसार कोणत्याही व्यक्तीच्या राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेतील ठेवींच्या साठ टक्के इतकी ठेव, असा आहे;

(घ) "व्यक्ती" यामध्ये,—

(एक) एक व्यक्ती,

(दोन) एखादे हिंदू अविभक्त कुटुंब,

(तीन) एखादी कंपनी,

(चार) एखादी पेढी,

(पाच) व्यक्तींचा अधिसंघ वा व्यक्तींचा निकाय, मग तो निगमित असो वा नसो, आणि

(सहा) पूर्वगामी उपखंडात न येणारी प्रत्येक कृत्रिम (वैधिक) व्यक्ती,

अंतर्भूत आहे, परंतु एखादे स्थानिक प्राधिकरण त्यात अंतर्भूत नाही.

(ङ) "योजना" याचा अर्थ,

(एक) कोणत्याही व्यक्तीस राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेत ठेव ठेवता यावी;

(दोन) त्या बँकेत गलिच्छ वस्ती निर्मूलन व गरिबांकरिता अल्प किंमतीत गृह निर्माण करणे यासाठी वित्तपुरवठा करण्याकरता उभारावयाच्या विशेष निधीत या ठेवींच्या रकमेच्या चाळीस टक्के रक्कम जमा करता यावी;

(तीन) ठेवीदाराने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही उद्देशांकरिता निव्वळ ठेवीचा उपयोग त्याला करता यावा;

हे शक्य करण्याच्या प्रयोजनार्थ, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ अन्वये त्या राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने तयार केलेली योजना, असा आहे.

(च) या अधिनियमात उपयोगात आणलेले परंतु, व्याख्या न केलेले आणि आयकर अधिनियम, १९६१ यामध्ये व्याख्या करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमात त्यांना जे अर्थ अनुक्रमे नेमून देण्यात आले असतील, तेच अर्थ असतील.

उन्मुक्ती.

३. (१) त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) योजनेनुसार, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेत जिने ठेव ठेवलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीला एखाद्या प्रयोजनासाठी मग ते कोणतेही असो— ठेवीचे स्वरूप व स्त्रोत प्रकट करण्यासाठी भाग पाडले जाणार नाही;

(ख) कोणत्याही व्यक्तीने ठेव ठेवली आहे या कारणावरून त्या व्यक्तीच्या बाबतीत अशा कोणत्याही कायद्याखाली कोणतीही चौकशी वा अन्वेषण सुरू करण्यात येणार नाही;

(ग) एखाद्या व्यक्तीने ठेव ठेवली आहे ही वस्तुस्थिती विचारात घेण्यात येणार नाही आणि कोणताही अपराध किंवा अशा कोणत्याही कायद्यान्वये शास्ती लादणे या संबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीत पुरावा म्हणून ती अग्राह्य असेल.

(२) भारतीय दंड संहिता १८६० (१८६० चा ४५) याचे प्रकरण ९ वे वा प्रकरण १७ वे, अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रेरक पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१), दहशतवाद व भंगनीय कार्य (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (१९८७ चा २८), भ्रष्टाचारप्रतिबंध अधिनियम, १९८८ (१९८८ चा ४९) या खालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाच्या अभियोगासंदर्भात किंवा लादलेली अन्य नागरी दायित्वे यांच्याप्रयोजनार्थ, पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

विशिष्ट प्रकरणामध्ये विचारात न घेतली जाणारी ठेव.

४. कलम ३ च्या उपबंधाच्या व्यापकतेला बाध न येता, —

(क) आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) खालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ ठेव विचारात घेतली जाणार नाही, आणि विशेषत: अशी ठेव ठेवल्याच्या कारणावरून त्या अधिनियमान्वये कोणत्याही आकारणीत, फेर-आकारणीत, अपिलात, निर्देशात किंवा अन्य कार्यवाहीत कोणत्याही वजावटी वा अनुतोष मागण्याचा वा त्या अधिनियमान्वये कोणतीही आकारणी, फेर आकारणी पुन्हा सुरू करण्याचा ठेवीदारास हक्क असणार नाही.

**स्पष्टीकरण:**—शंका निरसनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, ठेवीदाराला निव्वळ ठेवीच्या रकमेपासून जे उपार्जित वा प्राप्त होईल किंवा उपार्जित वा प्राप्त झाल्याचे मानण्यात आले असेल, अशा कोणत्याही उत्पन्नास, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) यांचे उपबंध लागू असतील;

(ख) १ एप्रिल, १९९२ पूर्वी सुरू होणाऱ्या कोणत्याही आकारणी वर्षासंबंधात, संपत्तीकर अधिनियम, १९५७ (१९५७ चा २७) अन्वये कोणत्याही करदात्याच्या निव्वळ संपत्तीचे संगणन करण्याच्या प्रयोजनार्थ, ही ठेव त्याच्या मत्तेचा भाग बनणार नाही.

१९८७ चा अधिनियम ५३ याचे विशोधन.

५. राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ यातील—

(क) कलम १४ मध्ये,

(एक) खंड (ख) मध्ये, "शेडयूल्ड बँका" या शब्दानंतर "किंवा कोणत्याही केंद्रीय, राज्य किंवा प्रांतिय अधिनियमाच्याद्वारे किंवा अन्वये स्थापन करण्यात आलेले किंवा गलिच्छ वस्ती निर्मूलन करण्यात गुंतलेले कोणतेही प्राधिकरण" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(दोन) खंड (ज) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:—

"(जज्) ऐच्छिक ठेवी (उन्मुक्ती आणि सूट) अधिनियम, १९९१ याच्या कलम २ च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट ठेव स्वीकारण्याच्या प्रयोजनार्थ एखादी योजना बनवणे आणि कलम ३७ अन्वये उत्पन्न केलेल्या विशेष निधीमध्ये अशा ठेवीच्या रकमेच्या ४० टक्के रक्कम जमा करणे; "

(ख) कलम १५ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल:—

"परंतु असे की, या खंडात अंतर्भूत असलेले काहीही, कलम १४ च्या खंड (जज्) ला अनुसरून बँकेने बनविलेल्या योजनेअन्वये ठेवी स्वीकारण्यास लागू होणार नाही; "

(ग) कलम ५५ च्या पोटकलम ५ मध्ये जेथे जेथे "विनियम" हा शब्द येईल तेथे तेथे त्याऐवजी "विनियम किंवा योजना" असे शब्द दाखल करण्यात येतील.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई